# सामाजिक - राजकिय कादंबरी 'ताम्रपट' : अभिव्यक्तिचा शोध

**महेश लटारु गेडाम**
संशोधन केंद्र
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
राजुरा, जिल्हा- चंद्रपुर
मो.न. ७७९८३३०९५७

**प्रा. डॉ. संतोष देठे**
एम ए.,एम.फिल.,पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक

---

***गोषवारा :***

*सामाजिक- राजकीय कादंबरी 'ताम्रपट' : अभिव्यक्तीचा शोध या शोधनिबंधामध्ये अभिव्यक्त होत असलेला आशय, संवाद, भाषाशैली, व्यक्तिरेखा तेथील प्रदेश, जीवनदर्शन, राजकीय व सामाजिक जाणीव इत्यादींचा अभ्यास करण्याचा दृष्टिकोन या शोधनिबंध मागील मुख्य हेतू आहे. त्यामुळे संशोधकाने सामाजिक - राजकीय कादंबरी ताम्रपट अभिव्यक्तीचा शोध च्या निमित्ताने तेथील घटना प्रसंग, प्रदेश, भाषा, व्यक्तिरेखा, विविध जाणीवा, संवाद अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच कादंबरीकार रंगनाथ पठारे यांच्या लेखन शैलीची वैशिष्ट्ये व वेगळेपण या शोधनिबंधातून अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे.*

**बीज सज्ञा :** व्यक्तिरेखा, भाषाशैली, अभिव्यक्ती, संवेदनशीलता, विविध जाणीवा, सामाजिक व नैतिक मूल्य.

---

**प्रस्तावना:**

कादंबरी हा लोकप्रिय वांग्मय प्रकार असून सर्वांना आवडणारा आहे. बाणभट्टाच्या कादंबरी पासून एक कल्पित मनोरंजन करणारा प्रकार म्हणून कादंबरीचे वैशिष्ट्ये अबाधित आहे. वांग्मयीन प्रयोजनात असलेला आनंद कादंबरीच्या वाचनाने पूर्णत्वास जाते. घडीभर विरंगुडा करण्यासाठी, मनाला आनंद देण्यासाठी कादंबरीचे वाचन केले जाते. कादंबरीचा विस्तृत असा जीवनपट आणि त्यातून जीवनाचे अनेक पदरी उघडलेले रंग कथानकातून सूक्ष्म निरीक्षणाद्वारे जीवनातील समस्या व संघर्ष याचे सखोल भान राखणारे असे कादंबरीचे तंत्र आहे. 'He who couches book touches my heart' असे एका आंग्ल लेखकाने आपल्या ग्रंथाबद्दल मोठ्या अभिमानाने उद्गार काढले आहेत. माणसाची लेखन शैली म्हणजे व्यक्तीची (style is the man ) इतकी एकरूपता किंवा तादात्म्य लेखकाला साधता आले पाहिजे. रंगनाथ पठारे यांनी निर्माण केलेल्या साहित्यात सामाजिक व राजकीय अनुभवांचे पडसाद उमटले आहेत. ताम्रपट ही कादंबरी ग्रामीण जीवनात स्वातंत्र पूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सामाजिक व राजकीय जाणीवासह तेथील व्यथा, वेदनासहीत चित्रित झाली आहे. ताम्रपट ही सामाजिक व राजकीय मूल्य जपणारी कादंबरी असून त्यात लेखकांनी नाना सिरूर, तुकाराम भोईटे, बापूसाहेब देशमुख, भुजाडी मामा, आवडाबाई इत्यादी पात्राद्वारे आपले सारे चिंतन वाचकांसमोर मांडले आहेत. चांगल्या दर्जेदार साहित्याची निर्मिती करावयाची हा ध्यास त्यांनी घेतलेला आहे. म्हणूनच रंगनाथ पठारे यांचे व्यक्तिमत्व यथायोग्य स्वरूपात वाचकांच्या

समोर यावेत म्हणून रंगनाथ पठारे यांची ताम्रपट मधून सामाजिक व राजकीय आशय व मर्म उलगडून दाखविण्याचा प्रयत्न मी ताम्रपट : अभिव्यक्तीचा शोध च्या माध्यमातून केलेला असून चोखंदळ वाचकाने याचे मूल्यमापन करावे.

**कादंबरीची व्याख्या :**

1) अर्नेस्ट बेकर यांच्या मते, 'ज्यात मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले जाते अशा गद्यात लिहिलेला कल्पित वृत्तांत म्हणजे कादंबरी होय.'

2) प्राध्यापक श्री मा कुलकर्णी यांच्या मते, 'कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकांच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य कला म्हणजे कादंबरी होय.'

**संशोधनाचा हेतू व उद्देश :**

1) कादंबरीतून व्यक्त झालेल्या सामाजिक व आर्थिक जाणीवांचा अभ्यास करणे.
2) कादंबरीतून व्यक्त झालेल्या संवाद शैलीचा अभ्यास करणे.
3) कादंबरीतून व्यक्त झालेल्या भाषाशैलीचा अभ्यास करणे.
4) कादंबरीतून व्यक्त झालेल्या भूप्रदेशाचा अभ्यास करणे.
5) कादंबरीतून व्यक्त झालेल्या सामाजिक व नैतिक मूल्यांचा अभ्यास करणे.

**गृहीतके :**

1) कादंबरी हा वांग्मय प्रकार व्यक्ती जीवनाचे वर्णन करते.
2) कादंबरीमध्ये व्यक्ती जीवनातील वेदना, सुखदुःख, समस्या, अन्याय, संघर्ष, चढ-उतार हे प्रखरपणे मांडलेले असते.
3) कादंबरीत समाजदर्शन, संस्कृती, आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती सोबतच त्या कालखंडाचा ही उल्लेख होत असतो.
4) कादंबरीतील सर्व घटना-प्रसंग वाचक वर्गासाठी प्रेरणादायी असतात.

**ताम्रपट : अभिव्यक्तीचा शोध :**

रुची म्हणजे एखाद्या गोष्टीविषयी आवड. रुची पासूनच अभिरुची हा शब्द तयार झाला आहे. अभिरुची म्हणजे शास्त्रशुद्ध संस्कार केलेली आवड. एखाद्या गोष्टीत आपणास स्वाभाविक रुची असते. तीच आपली रुची आपण हेतूपूर्वक आणि शास्त्रीय दृष्टीने अनेक अंगानी संस्कारीत करून विकसित केली की, तिलाच आपण अभिरुची असे म्हणतो. तसेच व्यक्ती म्हणजे आविष्कारण व्यक्त करणे या धातूपासून व्यक्ती हे नाम बनविले आहे. अभिव्यक्ती म्हणजे संस्कार आणि युक्त असे आविष्कारण किंवा अविष्कार असे शब्द बनविले जातात. तसेच अभिरुची या शब्दाचा शास्त्रीय संस्कारीयुक्तता अभिप्रेत असते. संवेदनशीलता, सहृदयता, सहानुभूती, कल्पकता हे व्यक्तिमत्त्वाचे घटक साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात. साहित्यकृतीचे लेखन हे कलात्मक स्वरूपाचे असते. तिच्यातील प्रत्येक शब्द अर्थयुक्त, अर्थपूर्ण असतो. त्या प्रत्येक शब्दाने निर्माण केलेली अर्थसंवेदना टिपण्याची क्षमता रसिकाजवळ नसेल तर त्याला साहित्यकृतीचे रूपसौंदर्य, अर्थसौंदर्य कळू शकणार नाही. म्हणून

संवेदनशीलता असणे अत्यावश्यक ठरते. सहृदयतेचा संबंध दुसऱ्याला गंभीरपणे समजून घेण्याची, दुसऱ्याच्या भावना आत्मसात करण्याची असतो. साहित्यकृतीतील पात्रप्रसंग, वातावरण, मानवीजीवन आत्मीयवृत्तीने समजून घेण्याची क्षमता म्हणजे सहृदयता होय. सहानुभूती हा सहुदयतेच्या अगदी जवळ असलेल्या शब्द आहे. साहित्यकृती निर्माण करण्याच्या साहित्यिकाने जो कलानुभव घेऊन साहित्यकृती निर्माण केली. त्या कलानुभवाशी एकात्म होण्याची क्षमता म्हणजे सहानुभूती होय. सहुदयता असल्याशिवाय सहानुभूती निर्माण होऊ शकणार नाही. सहानुभूती नसेल तर साहित्यकृती समजू शकणार नाही. तिच्यावर रसिकांकडून अन्याय होऊ शकतो. साहित्यकृतीच्या आस्वादकाला कल्पकतेची गरज असते. साहित्यकृती नीटपणे समजून घेण्यासाठी ती जीवनापेक्षा वेगळी आहे तिचे नियम वेगळे आहे हे गृहीत धरावे लागते. साहित्यकृतीचे जे घटक आहेत त्याचे गौणप्रधान स्थान तारतम्याने समजून घेण्याची गरज असते. मुख्य म्हणजे साहित्यकृतीचा ध्वन्यार्थ तिच्या व्यापक पातळीवरून अन्वयार्थ साहित्यकृतीच्या अनुभवाक प्रक्रियेतून निर्माण होणारे दर्शन, चिंतन व विचार फुलविण्याची कृती इत्यादीसाठी कल्पनेची नितांत गरज असते. अभिरुचीचा विकास प्रत्येक व्यक्तीने आपापल्या वैयक्तिक पातळीवरच साधण्याची आवश्यकता असते. कारण साहित्यकृतीचे वाचनही अंतिमतः वैयक्तिक घटना असते. आपण कोणती साहित्यकृती याचे स्वातंत्र्य व्यक्तीला परिपूर्ण असते. त्यामुळे अभिव्यक्तीचा विकास वैयक्तिक पातळीवरच करणे सोपे, सोयीचे आणि आनंदाचेही असते. या विकासासाठी आरंभी सांगितलेले घटक संवेदनशीलता, सहृदयता, सहानुभूती, कल्पकता हे घटक अधिक निर्णायक ठरतात.

**व्यक्तिरेखा :**

कादंबरीतील कथा ज्यांच्या सहाय्याने घडते त्यापैकी महत्त्वाचे अंग म्हणजे त्या कादंबरीतील व्यक्तिरेखा होत. त्यांना कादंबरीतील पात्र असेही म्हटले जाते. कथाकार व्यक्तीच्या वृत्ती, कृती वृत्ती, स्मृती, विचार, कल्पना, भावना, संवेदना, विचारप्रणाली, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून व्यक्तीची जी शब्दरूप प्रतिमा कथेत निर्माण करतो ती प्रतिमा म्हणजे पात्र होय. कादंबरीतील विचार या व्यक्तिरेखांच्या पात्रांच्या माध्यमातून लेखक मांडत असतो. या व्यक्तिरेखांवर कधी लेखकाचा प्रभाव असतो तर कधी लेखक तटस्थपणे यांना रेखाटतो. ताम्रपट कादंबरी चा अभ्यास करत असताना कादंबरीतील लक्षणीय व्यक्तिरेखा त्यांच्या वेगळेपणाच्या संदर्भाने मांडता येतील. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील बदलत्या सामाजिक व राजकीय अंगाचा विस्तृतपट ताम्रपटातून मांडताना त्यातील नाना शिरूर, तुकाराम भोईटे, बापूसाहेब देशमुख, भुजाडी मामा इत्यादी व्यक्तिरेखा मनात घर करतात.

**1) नाना शिरूर :**

वकील भास्करराव शिरूर यांचा हा मुलगा लहानपणी भांडखोर व उचापतीखोर असतो. त्यामुळे वडिलांकडून एकदाच अपमानित होतो व मनाने त्यांच्यापासून दुरावतो. पुढे देश प्रेमाने प्रेरित होऊन अंतर्बाह्य बदलून जातो. अच्युतराव पटवर्धन व रावसाहेब पटवर्धन यांना दैवत मानतो. समाजाची दीनदुबळयांची सेवा त्याचा स्थायीभाव आहे. स्वातंत्र्यलढ्यात सशस्त्र क्रांतीत, प्रतिसरकार स्थापन करण्यात याचा सक्रिय सहभाग असतो. नानांचा सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे संघटन कौशल्य. निर्मळ मन व दुसऱ्या प्रती समर्पित भावनेच्या बडावर लोक त्याच्याकडे ओढली जातात. वकिलीची प्रॅक्टिस ते पैशांकडे पाहून कधीच करत नाही. गोरगरीब त्यांच्याकडे हक्काने

येतात. कुटुंबासाठी जास्त वेळ न देता ही त्याचे कुटुंब त्यांच्यापासून दुरावत नाही. उलट पत्नी, मुलगा, मुलगी उत्तरोत्तर उन्नत व प्रगत होत जातात. देशासाठी केलेल्या कार्याबद्दल त्याला देशाकडून कशाचीही अपेक्षा नाही. साखर कारखान्यावर संचालक, शिक्षण संस्थेत संचालक असूनही त्याला त्याचा लोभ, लालसा व मोठेपणा वाटत नाही. त्या पदाचा तो राजीनामा देतो व त्यामागची कारणेही नमूद करतो. ह्या असल्या मिरवण्याच्या पदा ऐवजी तो बिडी कामगारांची संघटना बांधतो, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी चळवळ उभारतो, हमालांची संघटना बांधतो, धरणामुळे विस्थापित झालेल्यांसाठी आमरण उपोषण करतो. खरे तर नानावर सेवा दलांचा प्रचंड प्रभाव आहे. साने गुरुजींच्या विचारांचे आकर्षण आहे. सरकारने देऊ केलेले नाना नाकारतो. स्वातंत्र्यसैनिकांसाठीच्या सरकारी सवलती घेत नाहीत. पद्मश्री ला नकार देतो. त्याच्या या नकारात त्याची स्वतःची अशी मूल्यधारणा आहे. समाजकारण्याच्या, राजकारण्याच्या धावपळीत जीवन व्यतीत होत असतानाच मुलगा जयप्रकाश उच्चशिक्षित होऊन परदेशात जायची संधी नाकारून गोरगरीब आदिवासींच्या सेवा कार्याला वाहून घेतो व नानांच्या पावलावर पाऊल टाकतो. याचे नानाला समाधान वाटते. “सत्य, अहिंसा, करुणा आणि सत्याग्रह ही चतु:सूत्री नानांनी आयुष्यभर महत्त्वाची मानली. त्यांनी स्वार्थासाठी कधी काहीच केले नाही. जे काही कार्य केले ते या मूल्यांसाठी “ नाना आणीबाणीच्या विरोधात लढतो. सिताराम वैराट, शाळीग्राम सारखे कार्यकर्ते घडवतो. लौकिक अर्थाने सामान्य पण नैतिकतेच्या बळावर अलौकिक कर्तृत्व संपादन करणारा नाना शिरूर ताम्रपटाच्या केंद्रस्थानी येऊ पाहतो.

**2) तुकाराम भोईटे :**

नानांची सुरुवातीचे सहकारी मित्र कॉलेज जीवनापासून स्वातंत्र्यलढ्याकडे वळलेले स्वातंत्र्यलढ्यात इंग्रज विरोधी चळवळीत जखमी होऊन तुरुंगात गेल्यावर कम्युनिस्ट विचारधारेकडे झुकतात. पुंजा पाटील यांच्या वडिलांच्या समजावण्यावरून राजकारण सोडून आधुनिक शेती करतात. लोकाग्रहास्तव साखर कारखान्याचे अडलेले काम यशवंतराव चव्हाण यांच्या मदतीने मार्गी लावतात. लोक आपणहूनच त्यांचे नेतृत्व स्वीकारतात. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पद ते नंतर खासदार पदापर्यंत मजल मारतात. साखर कारखान्याच्या चेअरमन पदातून मोठे सत्ता केंद्र निर्माण करतात. सत्तेच्या पाठबळाने समाज विकासाचे काम करतात व क्वचित नीती आणि तिची परवा करेनाशे होतात. शिक्षण संस्था असो की तालुक्यातील महत्त्वाची सत्ता त्यांच्या केंद्रास्थानी आपणच राहू याची काळजी घेतात. तुकाराम भोईटे ते दादासाहेब होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. त्यांना मिळालेले ताम्रपट दिवाणखान्यात नजरेस भरेल असे लावतात. बंगल्याचे नाव ही ताम्रपट ठेवतात. सत्तेशिवाय समाजकारण शक्य नाही. शेवटी सत्तेच्या माध्यमातून कामे झटपट होतात. त्यासाठी दादासाहेब प्रवाह पतीत राजकारण करतात. आखीवरेखीव नियोजनपूर्वक पाऊल उचलत अनेक उद्योग उभारून भरपूर माया जमा करतात. राजकारणात सोयीस्कर निष्ठा बदलवतात. आधी यशवंतराव चव्हाण नंतर इंदिरा गांधीच्या बाजूने वळतात सत्तेची कास धरतात. एकुलत्या एक मुलाला अंकुशला राजकारणात पद्धतशीर प्रमोट करतात. अंकुशला व्यंग, व्याधीग्रस्त मुलगा व्हावयाचे त्यांना अतोनात दुःख वाटते. आत्तापर्यंत केलेला सर्व खटाटोप निरर्थक वाटू लागतो. आपण सध्यासाठी साधन म्हणून सोबत सोपा मार्ग निवडला. त्यात नैतिक-अनैतिकतेचा प्रश्न बाजूला ठेवला. त्याच कर्माचे हे फळ मिळाले तर नसेल? या विचाराने ते अस्वस्थ होतात. असमाधानी, अतृप्त, राहतात.

**3) बापूसाहेब देशमुख :**

९६ कुळी देशमुख यांच्या घरात जन्म झालेला असला तरी घरची स्थिती मात्र बेतास बात असते. स्वतःच्या हुशारीवर, मेहनतीवर बापूसाहेब वकील होतात. इंदिरा राजे सारख्या महत्त्वाकांक्षी मुलीशी प्रेमविवाह करतात. वकिलीची प्रॅक्टिस करता करता राजकारणात पाय रोवून आमदार पदावरून थेट मंत्री पदापर्यंत मजल मारतात. वाचनाचा छंद असलेले बापूसाहेब देशमुख तसे सुसंस्कृत आहेत. कलारसिक व थोडेसे अगळपगळ आहेत. जीवन जगण्यासाठी आवश्यक गोष्टींच्या पलीकडचा हव्यास त्यांना नाही. जनसामान्य लोकांत मिसळण्याचा ते प्रयत्न करतात. पण हा प्रयत्न निव्वळ प्रयत्नच्याच पातळीवर राहतो. त्यांचे उच्चभ्रू राहणीमान व वैचारिक कथेची उंची त्यांना सामान्यांपासून अलिप्तच ठेवते. बरेचसे निर्णय त्यांच्या पत्नी इंदिरा राजेवर सोपवितात. उदयच्या त्यांच्या मुलाच्या स्वैर वागण्याने ते त्रस्त होतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकारणात जो व्यवहारात शिरला त्याचे उदाहरण बापूसाहेब देशमुख आहेत. काँग्रेसला ते फायदेशीर व जात-जमातीच्या हिशोबाने नेमके निवडून येण्याची शक्यता असलेले उमेदवार वाटतात. आणि तीच त्याची ताम्रपटातील ओळख राहते.

**4) भुजाडी मामा :**

अत्यंत बेरकी, चाणाक्ष पण तेवढेच भाबडे वाटणारे भुजाडी मामा त्यांच्या आगळ्यावेगळ्या शैलीने ताम्रपटात आपली एक खास जागा निर्माण करतात. राजकारणात प्रचंड क्षमता ठेवणारे मामा तितकेच अभ्यासू आहेत. आपल्या मर्यादा ते जाणून असतात. आर्थिक मर्यादा असल्याने लोकल बोर्ड व पुढे सरपंचात समिती स्तरापर्यंत मर्यादित आहे. बापूसाहेब देशमुख यांना राजकारणाचे बारकावे शिकवणारा व पुढे आणणारा अशी भुजाडी मामांची ओळख ताम्रपटातून होते. भुजाडी मामांना मात्र त्यांच्या या मेहनतीचा फारसा फायदा होत नाही. त्यांना स्वातंत्र्यसैनिकचे मिळणारे सन्मानपत्र ही फारच उशिरा व तेही सगळ्या प्रकारचे प्रयत्न करून बापूसाहेबांच्या मदतीने मिळते. याची त्यांना खंत वाटते. तत्कालीन काळात माध्यमांची अचूक समज असणारा तो एकमेव राजकारणी असावा. भुजाडी मामांसारखे मेहनती कार्यकर्ते कायम दुसऱ्या फळीत राहतात व त्यांचा फायदा घेऊन, वापर करून नंतर त्यांच्या वाट्याला उपेक्षा येते. अशा उपेक्षित कार्यकर्त्यांचे प्रतिक म्हणूनच भुजाडी मामांच्या व्यक्तिरेखेकडे पहावे लागते.

ताम्रपटात नाना शिरूर यांच्या पत्नी अनुताई व बापूसाहेब देशमुख यांच्या पत्नी इंदिरा राजे या व्यक्तिरेखा ही लक्षणीय असून दोघेही परस्परविरुद्ध अंगाने ताम्रपटात येतात.

**भाषाशैली :**

भाषेद्वारेच विचार, मते व्यक्त करता येतात. एक प्रकारे भाषा ही कृतीच असते. कादंबरीत लेखनाला अभिप्रेत असलेली विचार, मते, चिंतन तो भाषेद्वारेच अभिव्यक्त करतो. लेखक कादंबरीत भाषा ज्या पद्धतीने वापरतो त्याचे वेगळे असे महत्त्व असते. प्रत्येक लेखकाची भाषाशैली वेगवेगळी असते. एकाच कादंबरीत लेखक वेगवेगळ्या भाषा शैलीचा वापर करू शकतो. अशा वेळेस शैली म्हणजे केवळ भाषाशैली इतका मर्यादित अर्थ समजून घ्यावा लागतो. साहित्याची भाषा इतर वेळी बोलल्या जाणाऱ्या भाषेपेक्षा वेगळी, विशिष्ट असते. वाचकाला आकर्षित करण्याचे, खिळवून ठेवण्याचे कौशल्य त्या भाषेत असते. "कादंबरी हा साहित्यप्रकार भाषेवर प्रभुत्व

मिळवणारा साहित्य प्रकार नसून भाषेला मुक्त करणारा साहित्यप्रकार आहे.” कादंबरीत भाषेची विविधता बघावयास मिळते. थर ठरवून नियोजनपूर्वक वापरलेली भाषा असो की सहज सुचलेली कादंबरी दोघांनाही सामावून घेते. “जाणिवेच्या पातळीवरील अनुभवाचे बाह्यरंग म्हणून कल्पनेच्या सहाय्याने भाषा अस्तित्वात येते.“ कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या जाणीवांना स्वतःचा असा एक अर्थ असतो व तो त्यांना भाषेमुळेच प्राप्त होतो. त्यावरूनच कादंबरीचे मूल्य ठरते. म्हणूनच कादंबरीच्या संदर्भात भाषाशैली महत्त्वाची आहे. १९४२ चा स्वातंत्र्यलढा, स्वातंत्र्यप्राप्ती व नंतर आणीबाणी पर्यंतचा कालखंड ताम्रपट मधून चित्रित होताना भाषेचे नानाविध रंग समोर येत राहतात. सामाजिक व आर्थिक जीवनात होणाऱ्या उलतापालथी व कादंबरीत विविध जाती जमाती व धर्माच्या व्यक्तिरेखांनी त्यांच्या भाषा वैशिष्ट्याने कादंबरी समृद्ध झालेली आहे. ती समाजाची आवडाबाई तरुणपणीच एका लेकीच्या जन्मानंतर नवरा प्लेगमध्ये मरून विधवा होते. तिचे वडील तिचे दुसरे लग्न लावून देण्याच्या विचारात असतात. पण निर्धाराने दुसऱ्या लग्नाला नकार देते. वडील तिला समजावतात. “मी म्हातारा माणूस. मपली आता काय जास्ती जिनगाणी राहिलेली नायी. पण तुला अजून पुरी उमर काढायची. आन ती काय सयज गोष्ट नायी. हाय माणसाचं सरील म्हंजी नरोक आसतोय बाई. आन सरीला परशी मन खराब. समद्या दुनियेला दाबता येतं, ताठ राहता येतं, पण मनाला स्वताच्या दाबून सरीराला नमवायची बात कायी सयज नायी”. भाषेचे कार्य अभिव्यक्त होणे असते. ह्या प्रसंगात अप्रगत जातीत जन्मलेल्या अडाणी, निरक्षर असण्याची शक्यता असलेल्या विधवा मुलीचा बाप जे मांडतो त्या मांडण्यातील भाषाशैली थक्क करणारी आहे. त्याने आपल्या परीने जी भाषा जोपासली आहे, इथून जीवनासंबंधीचे अवघड असे तत्त्वज्ञानच व्यावहारिक पातळीवर सोपे करून सांगितले आहे. शरीर व मन या वेगवेगळया पातळया असून शरीरापेक्षा मन सामर्थ्यशाली असते याची जाणीव तो आवडाईला करून देतो. त्याने मांडलेले विचार जरी बोली भाषेत असले तरी कुठल्याही प्रमाणभाषा व ग्रांथीक भाषेपेक्षा त्या चा दर्जा कमी ठरत नाही. हेच ताम्रपटच्या लेखकाच्या भाषा शैलीचे वैशिष्ट्य आहे. बापूसाहेब देशमुख व भुजाडी मामांची बापू साहेबांच्या घरी भोजनानंतर बैठक होते. बापूसाहेब देशमुख भुजाडी मामांची ओळख करून घेण्याच्या प्रयत्नात असतात. “छया छया! कामधंद्याची काहयाची बात करता देसमुक साहेब? त्या टायमाला ते ध्यान व्हतं कोन्हाला? जवान उमर व्हती. घोड्यासारखी ताकद अंगात व्हती. आन मुदली आम्ही पयलेपासून धाडशीच. पार खुशाल बेरड म्हणा की, जोखमीच अवघाड काही दिसलं का आम्ही धडकलोच तिथं. नाना पाटलाला तुम्ही पाहयल का कधी? नसन पाह्यलं समजा, तुमचा रस्ता निराळा व्हता.“ वरील संभाषणातून भुजाडी मामांचे समग्र व्यक्तित्व आपल्यासमोर उभे करणारी भाषा सरळ, सलग बोलीभाषा असली तरी तिचा एक ठसका आहे. भुजाडी मामाच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द ‘सोडा‘ ग्लासात ओतल्यावर ज्याप्रमाणे फसफसून वर येतो त्याप्रमाणे फसफसून बाहेर येतात. भाषेतील हा जिवंतपणा इतका चैतन्यशील आहे की, भुजाडी मामा जेव्हा बोलतात तेव्हा समोरच्याचे भान हरपते. भुजाडी मामाच्या तोंडी असलेली भाषा लेखकाने मोठ्या कलाकुसरीने साधलेली आहे. नाना सिरुरांची मूल्यांवर आधारित वैचारिक खोली दर्शविणारी भाषा. तुकाराम भोईटेंची आत्मभग्न असणारी, स्वतःशीश शब्दांची जुळवाजुळव करणारी भाषा, बापुसाहेबांची अंतर्बाह्य निर्मळ, निर्व्याज भाषा, प्रा.सिताराम वैराटची सडेतोड भाषा ; आणखी अशा कितीतरी व्यक्तिरेखा व प्रत्येकाची भाषाशैली जाणवण्या इतपत भिन्नभिन्न ठेवण्यात, वेगवेगळी वैशिष्ट्ये दर्शविण्यात रंगनाथ पठारे

कमालीचे यशस्वी झाले आहेत.

**निवेदनशैली :**

कादंबरीतील कथा निवेदक आपल्यासमोर मांडत असतो. भाविकच कथेच्या मांडणीवर निवेदकाचा प्रभाव असतो. कथेतील शब्द रूपांवर, संभाषितांवर प्रभाव असतो. कधी हा निवेदक कथाबाह्य असतो तर कधी कथांतर्गत. कादंबरीला प्राप्त होणारा आकार निवेदकाच्या निवेदनातूनच प्राप्त होत असतो. "हा सांगतो तो निवेदक होय. त्याच्या 'आवाजात' वाचकाला कथा ऐकू येत असतो." निवेदकाने केलेले निवेदन कादंबरीच्या आशयाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. कादंबरीतील चिंतन, शब्दांचे रूप, निवेदनशैलीमुळेच वैशिष्ट्यपूर्ण ठरते. १९६० नंतरच्या काळात कादंबरीच्या निवेदन शैलीत बरीच विविधता दिसून येते. " कथाबाह्य निवेदक आणि कथांतर्गत निवेदक असे निवेदकाचे दोन प्रकार म्हणून निवेदकाशी संबंधित वस्तुस्थितीचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला, तर दोन्ही प्रकारच्या निवेदकाचा उपयोग या काळातील कादंबरीने केला आहे, असे लक्षात येते. कथाबाह्य निवेदक हा महाकाव्याचा खास विशेष कथांतर्गत निवेदन ही कादंबरी या साहित्य प्रकाराने दिलेली देणगी आहे. 1960 नंतरच्या कादंबरीतून निवेदन शैलीत मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. भालचंद्र नेमाडे यांच्या कोसलाचा त्यात अग्रभागाने समावेश करावा लागतो. मोठा कालावकाश, भरपूर व्यक्तिरेखा, घटना, प्रसंगाने विस्तृत पट लाभलेल्या ताम्रपटची निवेदनशैली चतुरस्त्र आहे. नाना शिरूर, तुकाराम भोईटे, बापूसाहेब देशमुख इत्यादींच्या जीवनाधारणातील साम्य व भेद निवेदनाच्या पातळीवर प्रभावीपणे व्यक्त करण्यात रंगनाथ पठारेंना यश आले आहे. "उदयसिंग हा इंदिरा राजे व बापूसाहेब यांचा मुलगा. वय सुमारे दहा वर्षे, शिक्षणासाठी लोणावळ्याला डॉन बास्कोमध्ये. अगदी केजी पासून एकुलता एक मुलगा, नंतर काही झालं नाही. म्हणजे होऊ दिलं नाही. फिगर हा भाग आहेच." ह्या निवेदनातील वैशिष्ट्य म्हणजे अल्पाक्षरत्व. छोट्या छोट्या वाक्यांमधून आशयाची उंची वाढविली आहे. त्यातूनच कथानक गतिशील होण्यास हा आशय साहाय्यभूत होतो. इंदिरा राजेंची मानसिकता समर्थक शब्दात मांडणारे शब्दवैभव ह्या निवेदनात आहे. विशेष म्हणजे निवेदनशैली प्रभावी होण्यासाठी प्रतिमांचा वापर केलेला नाही. गोविंद भाईच्या गरिबीची, संसाराची, लग्न करून माहेरी आलेल्या तीन पोरी इत्यादींची नाना सिरूर यांना काळजी वाटते." आपापल्या पोटापुरते काम त्या करीत होत्या. बालपणापासून कमावलेली विडीबांधण्याचे कौशल्य त्याच्यापाशी पुरेपूर होते. कलेच्या अंगीकरणाच्या सोबतीने येणारा एक प्रकारचा आकांक्षाहीन पिवळट मध्यडपणाही त्यांच्यात अंगभूत गुणासारखा मुरला होता. अभाव,,अपुरेपण या सवयीच्या गोष्टी होत्या. वेगळे आनंददायी घडणे हीच आश्चर्याची बाब होती. त्यामुळे सारे ठीक होते. "तटस्थ अंगाने म्हणूनच पारदर्शी झालेले हे निवेदन आशियाशी एकात्म आहे. गोविंदभाईचा संसार व त्याची दुरावस्था प्रत्यक्ष आपल्या डोळ्यासमोर उभे करण्याची क्षमता या निवेदनशैलीत आहे. एखाद्या गंभीर आजाराने पीडित रुग्णांची निष्णात सर्जनने नित्याच्या सवयीने सहज यशस्वी शस्त्रक्रिया करावी तसे निवेदन ह्या घटनेप्रसंगी आलेले आहे. रंगनाथ पठारे यांचा अशा भिन्न निवेदन शैलीचा प्रयत्न ताम्रपटात वारंवार येतो, वाचकाला स्तिमित करून जातो. धरणग्रस्तांच्या सभेत नाना त्यांना मार्गदर्शन करतात. "आपण कोणालाही भीक मागत नाही. आपण आपले रास्त हक्क मागत आहोत. ते मागण्याची पाळी आपल्यावर येणं हे या शासनाला लाजिरवाणं आहे. आपल्याला नाही. आणि शांततेची,समंजसपणाची भाषा या मंडळींना समजत नसेल तर आपल्या वाजवी हक्कासाठी आपण आपला आवाज अधिक मोठा करू आपण अधिक तीव्रतेने लढू. कोणतीही किंमत द्यायची तयारी ठेवून लढू. नाहीतरी आपण सारेच गमावलेले आहे". धरणामुळे सर्वस्व गमावून बसलेल्या धरणग्रस्ताकडे नाना विशिष्ट मूल्यदृष्टीने पाहत आहे.

वैचारिकतेची पार्श्वभूमी लाभलेल्या निवेदन शैलीतून प्रकट होणारी बंडखोरी त्यांची मूल्यावरची श्रद्धा दाखवीते. तसेच त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे भानही यथार्थपणे प्रस्तुत करते. रंगनाथ पठारेंनी ताम्रपटातून सामान्यांचा,गोरगरिबांचा,पीडित,शोषितांचा आतला आवाज प्रसंगानुरूप भिन्नभिन्न निवेदन शैलीला साधन करून वाचकाला अंतर्मुख केले आहे.

**शोध निष्कर्ष:-**

1) ताम्रपट ही कादंबरी १९४२ ते १९८९ या कालखंडातील सामाजिक व राजकीय दर्शनावर प्रकाशझोत टाकते. कादंबरीची वैशिष्ट्ये ते कादंबरीचे मूल्यमापन करताना तेथील कथाबीज, संवाद, भाषाशैली, व्यक्तिरेखा इत्यादी विचारात घेणे अगत्याचे ठरते.

2) ताम्रपट या कादंबरीत सामाजिक व राजकीय जीवनाबरोबरच गोर-गरीब, दलित, उपेक्षित वर्गाचे दर्शन घडवते.

3) ताम्रपट मधील उच्च नैतिक मूल्य व कर्तव्यदर्शीपणा कादंबरीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवते.

4) ताम्रपट कादंबरीत रेखाटलेली पात्रे ही खरीखुरी व जिवंतपणा निर्माण करतात.

5) ताम्रपट कादंबरीतील भाषाशैली, संवादशैली यामुळे वाचकाच्या मनाचा ठाव घेणारी ठरते.

6) रंगनाथ पठारे यांच्या यशस्वीतेचे सामर्थ्य त्यांच्या जिवंत व वास्तवादी कथानकात, समर्थ भाषाशैली व संवादात आहे. त्यांच्या कादंबरीतील भाषा, मनोव्यापार चिंतित करण्यास अशी तरल व भावस्पर्शी आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- आनंद यादव, 1960 नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, पृष्ठ क्रमांक -45, 46
- गंगाधर पाटील, कथन मीमांसा अनुष्टुभ, दिवाळी अंक-1991, पृष्ठ क्रमांक -97
- रंगनाथ पठारे, ताम्रपट, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, तिसरी आवृत्ती जानेवारी 2009, पृष्ठ क्रमांक- 25, 26, 168
- रंगनाथ पठारे, ताम्रपट, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, तिसरी आवृत्ती जानेवारी 2009, पृष्ठ क्रमांक - 145, 423, 467
- चंद्रकांत बांदिवडेकर, देशीवान, अक्षर प्रकाशन मुंबई, पहिली आवृत्ती मार्च 2002,पृष्ठ क्रमांक - 375, 414, 442, 475